# बजाज इलेक्ट्रिकल्सचे ग्राहकाभिमुख उत्पादनावर लक्ष

नागपूर, ता. १० : बजाज इलेक्ट्रिकल्स लिमिटेडने २०१३-१४ मध्ये ७५ वर्षात पदार्पण केले आहे. हिरक महोत्सवी वर्षाच्यानिमित्ताने कंपनीच्या विविध योजना असून, ग्रामीण भागावर विशेष लक्ष केंद्रित करणार आहे. शिवाय मुंबई येथे स्वतःचे अत्याधुनिक संशोधन व विकास केंद्र सुरू करणार आहे. त्यासाठी ७० ते ८० कोटींचा निधी खर्च होण्याची शक्यता आहे, अशी माहिती कंपनीचे कार्यकारी संचालक (ग्राहक उत्पादक) पी. एस. टंडन यांनी पत्रकार परिषदेत दिली.

व्यावसायिक संबंध सुदृढ व्हावेत म्हणून प्रत्येक वितरकांशी संवाद साधण्यात येत आहे. भारतीय ग्राहकांच्या गरजा लक्षात घेऊनच नवीन ग्राहकोपयोगी वस्तूंचे उत्पादन करण्यात येत आहे. एलईडी दिव्यांपासून ते बहुकार्यक्षम ओटीजीपर्यंत अनेक उत्पादने बाजारात आणली आहेत. तसेच 'बजाज वर्ल्ड' अंतर्गत घरगुती आणि लायटिंग उत्पादने प्रदर्शित केली आहेत.

देशभरात ६८ बजाज वर्ल्ड सुरू करण्यात आले असून, येत्या मार्चपर्यंत तो आकडा १०० वर पोहोचविण्याचा कंपनीचा संकल्प आहे. कंपनीची उलाढाल १४०० कोटींची असून, बजाज इलेक्ट्रिकल्सच्या १९ शाखा कार्यालय आहेत. जवळपास २२०० वितरक ४१०० अधिकृत डिलर्स आहेत. हायमास्ट स्ट्रीट लाईट, ऑक्टगॉनल पोल्स, नागपूर मनपाचे हायमास्ट व रेल्वेस्थानकावर सीआय पोल्स हे प्रकल्प तसेच विविध प्रकल्पांकडून नव्या ऑर्डर्स मिळाल्या आहेत, असेही टंडन म्हणाले. पत्रकार परिषदेला बजाज वर्ल्डचे प्रमुख अमित सहानी उपस्थित होते.



वर्धा मार्ग : पत्रकारांना माहिती देताना पी. एस. टंडन, अमित सहानी.